# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/12/2022 (शनिवार) सायंकाळ


---

### अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. केळवद :– अंतर्गत ०७ किमी अंतरावर मौजा नरसाळा शिवार येथे दिनांक ०२/१२/२०२२ चे १६.०० वा. पुर्वी यातील **मृतक नामे– गुरुदेव दौलत काळे, वय 65 वर्ष, रा. नरसाळा, तह. सावनेर** याला ०३ वर्षा पासून पोटाचा कीडनीचा व लिव्हरचा तसेच मूळव्याधचा त्रास असल्याने त्याचा उपचार सुरू होता वर नमूद घटना ता वेळी व ठिकाणी यातील मृतक याने पोटाचे जास्त त्रास असल्याने त्या त्रासाला कंटाळून नरसाळा शिवार मधील आशिष पिंजरकर नागपूर यांचे शेतातील विहीरीत ऊडी घेऊन आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विठोबा दौलम काळे, वय ५० वर्ष, रा. नरसाळा (मृतकाचा लहान भाऊ) यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन केळवद येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. १५४७ ठाकरे मो. नं ८००७४ ९२६५६ हे करीत आहे.

२) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत मौजा घोराळ शिवार येथे दिनांक २८/११/२०२२ चे १५.०० वा. दरम्यान यातील **मृतक नामे– अनिल अन्नाजी गुरव, वय ६२ वर्ष, रा. घोराळ, ता.,कळमेश्वर, जि. नागपुर** हा घेराड शिवारात शेतात कापुस वेचत असतांना त्याच्या डाव्या पायाला विषारी सापाने चावा घेतल्याने त्याला प्रथम उपचारा करीता ग्रामीण, रूग्णालय कळमेश्वर येथे उपचार करून त्यानंतर तेथील डॉक्टरांनी रेफर केल्याने मेयो हॉस्पीटल, नागपुर येथे उपचार सुरू असताना डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– सहायक फौजदार अशोक जाधव ब. नं. १३४९ मेयो पोलीस बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस शिपाई नुमान शेख ब. नं. २३६७ मो. नं. ७९७२७२५४६० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर